लोकमत

# स्त्रीवाद - माध्यमे यांच्यात कायम द्वंद्व

## संध्या नरे - पवार; शिवाजी विद्यापीठातील कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** स्त्रीवाद आणि माध्यमे यामध्ये कायम द्वंद्व पाहायला मिळते. देशपातळीवरील विविध माध्यमांमधून स्त्रियांचे जे चित्रण होते. त्यामध्ये माध्यमे ही महत्त्वाची भूमिका पार पाडत असतात, असे प्रतिपादन मुंबई येथील ज्येष्ठ पत्रकार संध्या नरे-पवार यांनी बुधवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन केंद्रातर्फे 'माध्यमे व स्त्रिया' या विषयावर आयोजित केलेल्या कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. मानव्यशास्त्र सभागृहात कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वृत्तपत्र व संवादशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. निशा मुडे-पवार, तर डॉ. सुनीता शिर्के प्रमुख उपस्थित होत्या.

ज्येष्ठ पत्रकार पवार म्हणाल्या, आपल्या जगण्याच्या, मनोरंजनाच्या प्रक्रिया ठरविण्यामध्ये माध्यमांचा मोठा वाटा आहे. विविध घटक लिंगभाबातील असमानतेचा नकळतपणे अथवा जाणीवपूर्वक वापर करतात; त्यामुळे माध्यमे ही काही वेळेस स्त्री-पुरुषांमधील असमानतेचे बळकटीकरण करतात. माध्यमे ही पितृसत्तेची भूमिका कधी जाणीवपूर्वक, तर कधी नकळतपणे पार पाडतात. डॉ. मुडे-पवार म्हणाल्या, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर माध्यमे व स्त्रिया हा विषय फार महत्त्वाचा राहिलेला आहे. महिलांचे रोजगार, त्यांचे प्रश्न, निर्णय प्रक्रियेतील त्यांचा सहभाग यावर माध्यमांमध्ये चर्चा होणे गरजेचे आहे.

कार्यक्रमास 'लोकमत' चे संपादक वसंत भोसले, ज्येष्ठ पत्रकार दशरथ पारेकर, मराठी विभागप्रमुख डॉ. राजन गवस, राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार, विदेशी विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे, आदी उपस्थित होते.



कोल्हापुरात बुधवारी शिवाजी विद्यापीठामध्ये 'माध्यमे व स्त्रिया' या विषयावरील कार्यशाळेचे उद्घाटन ज्येष्ठ पत्रकार संध्या नरे-पवार यांच्या हस्ते झाले. यावेळी डावीकडून निशा मुडे-पवार, भारती पाटील, सुनीता शिर्के, कविता वड्राळे उपस्थित होत्या.

# स्त्रीवाद आणि माध्यम यांच्यात द्वंद्व

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

'देशपातळीवरील विविध माध्यमांमधून स्त्रियांचे जे चित्रण होत असते, त्यामध्ये माध्यमे महत्त्वाची भूमिका पार पाडत असतात. बऱ्याचदा स्त्रीवाद आणि माध्यमे यामध्ये कायम द्वंद्व पाहायला मिळते,' असे प्रतिपादन मुंबई येथील ज्येष्ठ पत्रकार संध्या नरे-पवार यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या कै. श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन केंद्राच्या वतीने 'माध्यमे व स्त्रिया' या विषयावर आयोजित कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. मानव्यशास्त्र इमारतीच्या सभागृहामध्ये झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. निशा मुडे-पवार होत्या. यावेळी डॉ. सुनीता डी. शिर्के प्रमुख उपस्थित होत्या.

पवार म्हणाल्या, 'सामाजिकरणाच्या प्रक्रियेत माध्यमांचा प्रभाव अधिक आहे. आपल्या जगण्याच्या आणि मनोरंजनाच्या




**ज्येष्ठ पत्रकार संध्या नरे-पवार यांचे प्रतिपादन**

व्याख्या ठरविण्यामध्ये माध्यमांचा मोठा वाटा आहे. विविध घटक लिंगभावातील असमानतेचा नकळतपणे अथवा जाणीवपूर्वक वापर करीत असतात. त्यामुळे माध्यमे ही काहीवेळा स्त्री-पुरुषांमधील असमानतेचे बळकटीकरण करतात. माध्यमे ही पितृसत्तेची भूमिका कधी जाणीवपूर्वक, तर कधी नकळतपणे पार पाडत असतात. कष्टकरी कामगार स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराविषयी माध्यमांना आस्था असतेच असे नाही. परंतु अशा प्रकारचा अन्याय जर हॉलिवूड किंवा बॉलिवूडमध्ये होत असेल तर माध्यमे त्याची लगेच दखल घेतात स्त्रीच्या जगण्याचा, कर्तृत्वाचा उल्लेख बातमीत असला तरी मुख्य चौकट पुरुषप्रधान संस्कृतीची असते. आजही महिला पत्रकार मुख्य धारेतील माध्यमांमध्ये उपसंस्कृतीचा भाग बनत आहेत. कष्टकरी, शेतकरी स्त्रियांच्या रोजगाराचे अधिकाधिक अवमूल्यन होत आहे. जोपर्यंत माध्यमांमधील मुख्य बातम्यांमध्ये स्त्रियांना स्थान मिळत नाही, तोपर्यंत समान पातळीवर स्त्रिया आल्या, असे वाटणार नाही.'

अध्यासन केंद्राचे समन्वयक अधिष्ठाता डॉ. भारती पाटील यांनी प्रास्ताविक केले. शीतल पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. कविता वड्राळे यांनी आभार मानले.

पुढारी

# स्त्रियांच्या चित्रणामध्ये माध्यमांची भूमिका महत्त्वाची

## शिवाजी विद्यापीठ कार्यशाळेत मान्यवरांचा सूर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

देशपातळीवरील विविध माध्यमांमधून स्त्रियांचे जे चित्रण होत असते, त्यामध्ये माध्यमे महत्त्वाची भूमिका पार पाडत असतात, असा सूर विविध मान्यवरांनी व्यक्त केला. शिवाजी विद्यापीठातील श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन केंद्राच्या वतीने 'माध्यमे व स्त्रिया' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा झाली.

मानव्यशास्त्र सभागृहामध्ये झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वृत्तपत्र व संवादशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. निशा मुडे-पवार होत्या. ज्येष्ठ पत्रकार संध्या नरे-पवार, डॉ. सुनीता शिर्के प्रमुख उपस्थित होते.

नरे-पवार म्हणाल्या, सामाजिकरणाच्या प्रक्रियेत माध्यमांचा प्रभाव अधिक आहे. आपल्या जगण्याच्या आणि मनोरंजनाच्या प्रक्रिया ठरविण्यामध्ये माध्यमांचा मोठा वाटा आहे. विविध घटक लिंगभावातील असमानतेचा नकळतपणे अथवा जाणीवपूर्वक वापर करीत असतात. त्यामुळे माध्यमे ही काही वेळेस स्त्री-पुरुषांमधील असमानतेचे बळकटीकरण करतात. माध्यमे ही पितृसत्तेची भूमिका कधी जाणीवपूर्वक तर कधी नकळतपणे पार पाडीत असतात.

डॉ. मुडे-पवार म्हणाल्या, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर माध्यमे व स्त्रिया हा विषय फार महत्त्वाचा राहिलेला आहे. महिलांचे रोजगार, त्यांचे प्रश्न, निर्णय प्रक्रियेतील त्यांचा सहभाग यावर माध्यमांमध्ये विस्तृत चर्चा होणे गरजेचे आहे. अधिष्ठाता डॉ. भारती पाटील यांनी प्रास्ताविक तर शीतल पाटील यांनी सूत्रसंचालन आणि डॉ. कविता वड्राळे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. मेघा पानसरे, डॉ. राजन गवस, डॉ. प्रकाश पवार आदींसह विविध विभागातील प्राध्यापक, संशोधक, विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 DEC 2018
तरुण भारत

# महिलांप्रश्नी माध्यमांची पितृसत्तेची भूमिका

प्रतिनिधी
कोल्हापूर

देशपातळीवरील महिलांच्या चित्रणात माध्यमांची भूमीका महत्वाची असून कधी जाणीवपूर्वक तर कधी नकळतपणे ती पितृसत्तेची भूमिका पार पाडतात. सामाजीकरणाच्या प्रक्रीयेत माध्यमांचा प्रभाव अधिक आहे. असे मत मुंबई येथील ज्येष्ठ पत्रकार संध्या नरे-पवार यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठातील कै. श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन केंद्राच्यावतीने 'माध्यमे व स्त्रिया" विषयावर आयोजित एक दिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. मानव्यशास्त्र इमारतीच्या सभागृहामध्ये झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. निशा मुडे-पवार होत्या. डॉ. सुनिता शिर्के यांची प्रमुख उपस्थिती होती.

ज्येष्ठ पत्रकार पवार म्हणाल्या, आपल्या जगणाच्या आणि मनोरंजनाच्या प्रक्रीया ठरविण्यामध्ये माध्यमांचा मोठा वाटा आहे. विविध घटक लिंगभावातील असमानतेचा नकळतपणे अथवा जाणीवपूर्वक वापर करीत असतात. स्त्रीच्या जगण्याचा, कर्तुत्वाचा उल्लेख बातमीत असला तरी मुख्य चौकट पुरुष प्रधान संस्कृतीची असते. अशी खंत त्यांनी व्यक्त केली. त्या म्हणाल्या, आजही, महिला पत्रकार मुख्य धारेतील माध्यमांमध्ये उपसंस्कृतीचा भाग बनत आहेत. कष्टकरी, शेतीकरी स्त्रियांच्या रोजगाराचे अधिकाधिक अवमूल्यन होत आहे. जो पर्यंत माध्यमांमधील मुख्य बातम्यांमध्ये स्त्रियांना स्थान मिळत नाही. तो पर्यंत समान पातळीवर स्त्रिया येतील, असे वाटत नाही.

**ज्येष्ठ पत्रकार संध्या नरे-पवार यांचे मत**

डॉ. निशा मुडे म्हणाल्या, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर माध्यमे व स्त्रिया हा विषय फार महत्वाचा राहिला आहे. महिलांचे रोजगार, त्यांचे प्रश्न निर्णय प्रक्रीयेतील त्यांचा सहभाग यावर माध्यमांमध्ये विस्तृत चर्चा होण्याची गरज आहे असे मत त्यांनी व्यक्त केले.

अध्यासन केंद्राचे समन्वयक अधिष्ठाता डॉ. भारती पाटील यांनी प्रास्ताविक तर शितल पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. कविता वड्राळे यांनी आभार मानले. यावेळी ज्येष्ठ पत्रकार दशरथ पारेकर, ज्येष्ठ पत्रकार वसंत भोसले, डॉ. राजन गवस, डॉ. प्रकाश पवार, डॉ. मेघा पानसरे, आदी उपस्थित होते.

# नव्या ज्ञानसंस्कृतीची निर्मिती

कोल्हापूर टाइम्स टीम

'मराठी विश्वकोश ज्ञानमंडळांच्या माध्यमातून महाराष्ट्रातील विद्वतजणांना एकत्र करून नवी ज्ञानसंस्कृती निर्माण करीत आहेत,' असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष दिलीप करंबेळकर यांनी केले. विश्वकोश निर्मिती मंडळ आणि शिवाजी विद्यापीठ यांच्यावतीने आयोजित आधुनिक इतिहास ज्ञानमंडळाच्या नोंदलेखक कार्यशाळेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी मानव्यशास्त्र विभागाच्या अधिष्ठाता डॉ. भारती पाटील होत्या.

करंबेळकर म्हणाले, 'मातृभाषेतून मिळालेले ज्ञान परिवर्तनास पोषक असते. त्यामुळे इतिहास लेखकांनी तटस्थपणे नोंदलेखन करून ते पुढील पिढ्यांसाठी ज्ञानसंचित राहील, याची काळजी घ्यावी. तर व्यक्तीची सामाजिक व राजकीय भूमिका इतिहासातून घडत असते, त्यासाठी निष्पक्ष इतिहासलेखन करावे.'

आधुनिक इतिहास ज्ञानमंडळाच्या फलकाचे अनावरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यशाळेत सहभागी लेखकांनी लिहून आणलेल्या नोंदींवर सामूहिक चर्चा झाली. तसेच डॉ. अरुणचंद्र पाठक, सरोजकुमार मिठारी यांनी नोंदलेखनाबाबत मार्गदर्शन केले. कार्यशाळेत कोल्हापूरसह सांगली, सातारा, सोलापूर, रत्नागिरी येथील ५० इतिहास अभ्यासक, लेखकांनी सहभाग घेतला.



शिवाजी विद्यापीठात आयोजित कार्यक्रमात बोलताना विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष दिलीप करंबेळकर.

## 'विश्वकोश' मंडळाचे अध्यक्ष करंबेळकर यांचे प्रतिपादन

यावेळी मराठी विभागप्रमुख डॉ. राजन गवस, विश्वकोश मंडळाचे सदस्य डॉ. अरुणचंद्र पाठक, इतिहास विभागप्रमुख डॉ. नंदा पारेकर, समन्वयक डॉ. अवनीश पाटील, उमाकांत खामकर, ज्येष्ठ पत्रकार दशरथ पारेकर,डॉ. नीलांबरी जगताप प्रमुख उपस्थित होते. शिवाजी विद्यापीठ येथील इतिहास अधिविभागात कार्यशाळा झाली. स्वागत व प्रास्ताविक डॉ. अवनीश पाटील यांनी केले, सूत्रसंचालन प्रा. दत्तात्रय मचाले यांनी केले. डॉ. नंदा पारेकर यांनी आभार मानले.

पुढारी

# इतिहास लेखकांनी तटस्थपणे नोंदलेखन करावे

## दिलीप करंबेळकर यांचे प्रतिपादन



**कोल्हापूर : प्रतिनिधी**

मातृभाषेतून मिळालेले ज्ञान परिवर्तनास पोषक असते. त्यामुळे इतिहास लेखकांनी तटस्थपणे नोंदलेखन करून पुढील पिढ्यांसाठी ते ज्ञानसंचित राहील, याची काळजी घ्यावी, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष दिलीप करंबेळकर यांनी केले.

विश्वकोश निर्मिती मंडळ व शिवाजी विद्यापीठ यांच्यावतीने आयोजित आधुनिक इतिहास ज्ञानमंडळाच्या नोंदलेखक कार्यशाळेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी मानव्यशास्त्र विभागाच्या अधिष्ठाता डॉ. भारती पाटील होत्या.

करंबेळकर म्हणाले, मराठी विश्वकोशज्ञानमंडळांच्या माध्यमातून महाराष्ट्रातील विद्वतजणांना एकत्र करून नवी ज्ञानसंस्कृती निर्माण करीत आहेत. व्यक्तीची सामाजिक व राजकीय भूमिका इतिहासातून घडत असते. त्यासाठी निष्पक्ष इतिहासलेखन करावे, असे आवाहन डॉ. भारती पाटील यांनी केले.

आधुनिक इतिहास ज्ञानमंडळाच्या फलकाचे अनावरण करण्यात आले. कार्यशाळेत लेखकांनी लिहून आणलेल्या नोंदींवर सामूहिक चर्चा झाली.

कार्यशाळेत कोल्हापूरसह सांगली, सातारा, सोलापूर, रत्नागिरी येथील इतिहास अभ्यासक, लेखक यांनी सहभागी झाले होते. प्रास्ताविक डॉ. अवनीश पाटील यांनी केले, सूत्रसंचालन प्रा. दत्तात्रय मचाले यांनी केले. इतिहास विभागप्रमुख डॉ. नंदा पारेकर यांनी आभार मानले. यावेळी विश्वकोश मंडळाचे सदस्य डॉ. अरुणचंद्र पाठक, विद्या व्यासंगी सरोजकुमार मिठारी, उमाकांत खामकर, डॉ. राजन गवस, डॉ. निलांबरी जगताप उपस्थित होते.

# पर्यावरणपूरक संशोधन हवे



## कॅनडाचे प्रा. ल्यू ख्रिस्तोफर यांचे प्रतिपादन

कोल्हापूर टाइम्स टीम

'मानवाच्या अस्तित्वासाठी पर्यावरणपूरक संशोधन करणे ही जागतिक संशोधन समुदायासमोरचे प्राध्यान्य असायला हवे. जीवन सुखकर करण्यासाठी आपण जे संशोधन करीत आलो आहोत, त्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत चालल्याचे चित्र आज निर्माण झाले आहे. असेच होत राहिले तर पर्यावरणाचाच भाग असलेल्या मानवाचेही अस्तित्व धोक्यात आल्याखेरीज राहणार नाही. त्यामुळे संशोधकांनीच आता ती जबाबदारी उचलून पर्यावरणपूरक संशोधनावर भर दिला पाहिजे,' असे प्रतिपादन कॅनडाच्या लेकहेड विद्यापीठातील प्रा. ल्यू ख्रिस्तोफर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात आजपासून 'मटेरिअल्स व एन्व्हायर्नमेंट सायन्सेस' या विषयावरीलआंतरराष्ट्रीय परिषदेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के होते.

शिवाजी विद्यापीठाचा वनस्पतीशास्त्र अधिविभाग, संगणकशास्त्र अधिविभाग, युसिक विभाग, श्री यशवंतराव पाटील विज्ञान महाविद्यालय, सोळांकूर, न्यू कॉलेज, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने ही परिषद आयोजित करण्यात आली.

प्रा. ल्यू ख्रिस्तोफर म्हणाले, 'आंतरविद्याशाखीय आणि बहुशाखीय संशोधन होणे ही काळाची गरज आहे. त्या दृष्टीने विज्ञानाच्या सर्वच शाखांमधील संशोधकांनी एकत्र येऊन विचारमंथन करण्याची मोठी गरज आज निर्माण झाली आहे. त्या दृष्टीने यासारख्या परिषदा सातत्याने जगभरात होणे अत्यावश्यक आहे.' अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, 'भौतिक विज्ञानात मटेरियल्सच्याही पुढे आता ॲडव्हान्स्ड मटेरिअल्स, नॅनो-स्ट्रक्चर्ड मटेरिअल्स अशा नवसंशोधन शाखा उदयास आल्या आहेत. त्यांनी संशोधनाची दिशाच बदलून टाकली आहे. सोने आणि चांदीचे नॅनो कण, कार्बन नॅनो ट्यूब्ज, ग्राफिन अशा नवीन प्रकारच्या कणांच्या शोधाने क्रांती घडवून आणली आहे.'

प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, 'संशोधकांनी सुरक्षित, स्वस्त, वापरण्यास सुलभ अशा प्रकारचे तंत्रज्ञान आणि उत्पादने निर्माण करण्याचे धोरण ठरवून त्या दिशेने संशोधन करण्याची आज गरज आहे.'

यावेळी परिषदेच्या स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. प्राचार्य व्ही. एम. पाटील, ए. वाय. पाटील यांनी मनोगते व्यक्त केली. डॉ. आर. के. कामत यांनी स्वागत व प्रास्ताविक केले, तर डॉ. मानसिंगराज निंबाळकर यांनी आभार मानले. या परिषदेत कॅनडासह ऑस्ट्रेलिया, बांगलादेश, नेपाळ, तैवान, श्रीलंका, सौदी अरेबिया देशांतील संशोधक सहभागी झाले.